दाखल तारीख - १४.०२.२०१२
नोंदणी तारीख - १६.०३.२०१२
निकाल तारीख - ०५.०३.२०१९
कालावधी -०६ वर्षे ११ महिने १७दिवस

पुणे येथील सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पुणे यांचे न्यायालयात
(पिठासन अधिकारी - राजेश क. खोमणे)

स्पेशल दिवाणी मुकदमा क्र.३४७/२०१२
निशाणी क्र.१५२
CNR NO.MHPU020015792012

श्री.रामदास मारुती जाधव	)	
वय ६० वर्षे, धंदा - शेती,	)	
रा. चिखली, ता. हवेली, जि. पुणे.	)	वादी

- विरुध्द -

१.	श्री.आनंदा ज्ञानदेव अभंग,	)
	वय ६० वर्षे, धंदा- शेती.	)
	कै.ज्ञानदेव महादू अभंग	)
	(मयत) वारस	)
२.	श्री.तुकाराम ज्ञानदेव अभंग	)
	वय ५५ वर्षे, धंदा- शेती.	)
		)
३.	श्री.सखाराम ज्ञानदेव अभंग	)
	वय ४५ वर्षे, धंदा - शेती.	)
		)
४.	कै.माणिक मारुती अभंग (मयत) तर्फे वारस -	)
		)
	१. श्रीमती हिरा माणिक अभंग	)
	वय ६० वर्षे, धंदा- काही नाही.	)
		)
	२. सौ. संगिता राजेंद्र पवार,	)
	वय ३५ वर्षे, धंदा- काही नाही.	)
	३. सौ.सुनिता दिलीप कदम,	)
	वय ३५ वर्षे, धंदा- काही नाही,	)
	क्र.१ ते ३ रा.१२०/४०, गांधीनगर,	)
	गणेशमळा,सिंहगड रोड, पुणे.	)

५. श्री.साहेबराव मारुती अभंग वय ५५ वर्षे, धंदा- शेती.	)	
६. श्री.मोहन मारुती अभंग वय ५० वर्षे, धंदा- शेती, सर्व रा.ढोक सांगवी, परीटवस्ती, ता.शिरुर, जिल्हा पुणे.	)	
७. श्री.अशोक गंगाधर पवार, वय ५५ वर्षे, धंदा- शेती, रा.निंबळक, तालुका व जिल्हा अहमदनगर,	)	प्रतिवादी.

दावा - ठराव, ताकिद व ताब्यासाठी.

सहभाग -

वादी तर्फे वकील	–	श्री.जामदार.
प्रतिवादी क्र.१ ते ७ तर्फे वकील	–	श्री. महाजन
प्रतिवादी क्र.७ तर्फे वकील	–	श्री.संचेती.

न्यायनिर्णय
(दिनांक ०५.०३.२०१९ रोजी)

प्रस्तुत दावा हा उदघोषणा व ताबा मिळण्या करिता दाखल केला आहे.

२. दाव्यातील मिळकतीचे वर्णन थोडक्यात खालील प्रमाणे -

(अ) गट नं.१२४९, मौजे रांजणगाव गणपती, ता.शिरुर, जि. पुणे येथील जमीन एकुण क्षेत्र ०१ हेक्टर ७२ आर पैकी १ हेक्टर २९ गुंठे यांसी चतुःसिमा -

पुर्वेस - ढोक सांगवी शिव.

पश्चिमेस - गट नं.१२४८.

दक्षिणेस - गट नं.१२४८ पैकी किसन अभंग यांची मिळकत.

उत्तरेस - गट नं.१२४९ पैकी आनंदा अभंग यांची मिळकत.

(ब) गट नं.१२४९, मौजे रांजणगाव गणपती, ता.शिरुर, जि. पुणे येथील जमीन एकुण क्षेत्र ०१ हेक्टर ७२ आर पैकी १ हेक्टर २९ गुंठे यांसी चतुःसिमा -वर (अ) मध्ये वर्णन केलेल्या क्षेत्र ०१ हेक्टर ७२ आर पैकी उर्वरीत क्षेत्र ४३ आर, यांसी चतुःसिमा -

पुर्वेस - ढोक सांगवी शिव.

पश्चिमेस - गट नं.१२४८ ची जागा.

दक्षिणेस - गट नं.१२४९ मधील वादी यांची जागा

उत्तरेस - गट नं.१२४९ मधील ज्ञानदेव व मारुतीच्या नावाची जागा.

(क) एकत्रीत दावा मिळकत ६ हेक्टर १७ आर पैकी क्षेत्र ०१ हेक्टर ७२ आर ज्ञानदेवच्या वहिवाटीतील जागा.

(ड) एकत्रीत दावा मिळकत ६ हेक्टर १७ आर पैकी क्षेत्र ०१ हेक्टर ७३ आर मारुतीच्या वहिवाटीतील जागा. (क) व (ड) चे एकुण क्षेत्र ३ हेक्टर ४५ आर. (क) व (ड) या दोनही मिळकतीच्या एकत्रीत चतुःसिमा -

पुर्वेस - ढोक सांगवी शिव.

पश्चिमेस - गट नं.१२४८.

दक्षिणेस - गट नं.१२४९ पैकी शिल्लक इतर व्यक्ती.

उत्तरेस - सोनेसांगवीची शिव व रस्ता.

(उपरोक्त नमूद सर्व मिळकतींना सोयीकरीता 'वाद मिळकत' असे या पुढे संबंधोण्यात येत आहे.)

३. प्रस्तुत दाव्यात वादीचे तथ्यकथन थोडक्यात खालील प्रमाणे -

रांजणगाव गणपती येथील गट क्र.१२४९ एकूण क्षेत्र १० हेक्टर ३४ गुंठे हीचे मुळ मालक अनिलकुमार मनसुखलाल धाडीवाल हे होते. सदर मिळकतीत

विष्णू महादू परीट व भागूजी राघू अभंग (परीट)हे दोघे संरक्षीत कुळ होते. दोघा संरक्षीत कुळांनी मुळ मालका कडुन खरेदी करण्याचे ठरविणेत आले. त्यांना दिनांक ०६.०३.१९७८ रोजी प्रत्येकी आर्धा हिश्यांप्रमाणे रक्कम रु.३,०००/- च्या मोबदल्यात सदर मिळकत खरेदी केली. त्या आधारे दोघांना प्रत्येकी अर्धा हिश्या प्रमाणे मालकी हक्क सदर मिळकतीत प्राप्त झाली. त्या अन्वये विष्णू महादू परीट (अभंग) यांच्या हिश्यांस ५ हेक्टर १७ गुंठे म्हणजेच प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत आली.

४. विष्णू महादू परीट यास भिकुबाई ही पत्नी होती. त्या दोघांनाही अपत्य नव्हते. वादी हा भिकुबाईच्या बहिणीचा मुलगा आहे. वृध्दावस्थेत भिकुबाई व तिचा पती विष्णू या दोघांची देखभाल वादीने केला. विष्णू याच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी भिकुबाई ही त्याची एकमेव वारस होती. वाद मिळकत पैकी वाद मिळकत क्र.१अ हि भिकुबाईने वादीच्या लाभात मृत्युपत्र आधारे हस्तांतरीत केली.

५. प्रतिवादी क्र.१ व विष्णू महादू परीट यांचे दोन भाऊ नामे ज्ञानदेव व मारुती यांनी बनावट व खोटया पध्दतीने मुंबई कुळ कायदा कलम ३२-ग अन्वये ते वाद मिळकतचे संरीक्षीत कुळ आहेत व असे प्रमाणपत्र तहसिलदार, शिरुर यांच्याकडुन स्वतःच्या नावे प्राप्त केले. वाद मिळकत ही विष्णू महादू परीट यास संरक्षित कुळ म्हणून प्राप्त झाली असल्याने कलम ३२-एम चे प्रमाणपत्र विष्णू महादू परीट याच्या नावे देणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र.१ व २ यांनी तहसिलदार, शिरुर यांची दिशाभुल करुन ते प्रमाणपत्र स्वतःच्या नावे हस्तगत केले. त्या प्रमाणपत्रा अन्वये प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या लाभात दिनांक ०४.०६.२००९ रोजी वाद मिळकत क्र.(क) व (ड) ही रक्कम रु.८,५०,०००/- च्या मोबदल्यात खरेदीखता द्वारे विक्री केली. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचा वाद मिळकत क्र.(क) व (ड) मध्ये कोणत्याही प्रकारे हितसंबंध किंवा अधिकार नसतानाही त्यांनी सदर मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादी क्र.७ च्या लाभात निष्पादीत करुन दिले.

त्यामुळे ते खरेदीखत वैध नाही.

६. वादीने पुढे असे तथ्यकथन केले की, वाद मिळकत क्र. १(अ) ही त्याच्या ताब्यात व उपभोगात आहे आणि त्यास ती मृत्यूपत्रा आधारे प्राप्त झाली आहे. त्यामुळे सदर मिळकतीवरील त्याचा ताबा वैध व कायदेशीर आहे. म्हणून वाद मिळकत पैकी वाद मिळकत क्र.१ (अ) वरील त्याचा ताबा हा कायदेशीर असल्याची उदघोषणा प्रस्तुत दाव्याद्वारे मागणी केलेली आहे आणि वाद मिळकत क्र.(क) व (ड) हिचे प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या लाभात निष्पादीत करुन दिलेले खरेदीखत रद्द होवून मिळण्याची विनंती केली आहे.

७. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी संयुक्त लेखी म्हणणे दाखल केले. वाद मिळकतीच्या चतुःसिमा चुकीच्या नमूद केल्या असल्याचे त्यांनी लेखी उत्तरात तथ्यकथन केले आहे. प्रस्तुत दाव्यात वादीने मागितलेला अनुतोष हा मुंबई कुळ अधिनियम कलम ३२-एम चे प्रमाणपत्र रद्द करण्याच्या अनुषंगाने असल्यामुळे सदर दावा दिवाणी न्यायालयास चालविण्याचा अधिकार नाही. म्हणून प्रस्तुत दावा हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रा बाहेर आहे असे तथ्यकथन त्यांनी केले आहे.

८. भागोजी राघू अभंग याच्या वारसांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट न केल्याने त्याची बाधा प्रस्तुत दाव्यास येत असल्याचे कथन त्यांनी केले आहे.

९. वाद मिळकत क्र.१(क) व (ड) प्रतिवादी क्र.७ यास त्यांनी नोंदणीकृत खरेदीखता अन्वये विक्री केली आहे व त्यांना ती विक्री करण्याचा पुर्ण अधिकार होता असे लेखी उत्तरपत्रात त्यांनी नमूद केले. वाद मिळकत पैकी वाद मिळकत क्र.१(अ) हि वादीच्या ताब्यात नसून प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे असे त्यांनी नमूद केले. सरतेशेवटी त्यांनी वादीने खोटा दावा दाखल केल्याचे कथन केले आहे.

१०. प्रतिवादी क्र.७ ने लेखी उत्तरपत्र दाखल करुन वादीच्या दाव्यास हरकत घेतली. वादीने प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार समाविष्ट न केल्या मुळे त्याची बाधा निर्माण होत आहे असे नमूद केले आहे. वाद मिळकत क्र.१(अ) हि त्याने प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्याकडुन नोंदणिकृत खरेदीखताने खरेदी केली असल्याने तो तिचा कायदेशीर मालक असल्याचे त्याने कथन केले आहे. सदर मिळकत हि त्याने पैशाच्या मोबदल्यात खरेदी केली असल्यामुळे त्याची मालकी त्यास प्राप्त झालेली आहे आणि म्हणून वादीस त्या संबंधी करण्यात आलेल्या खरेदीखतास हरकत घेण्याचा कोणताही अधिकार नसल्याने प्रस्तुत दावा हा नामंजूर करण्यात यावा अशी त्यांने विनंती केली आहे.

११. माझे पुर्वाधिकारी यांनी निशाणी ३८ वर विवादीत मुद्दयांची रचना केली आहे. त्यांची पुर्नवृत्ती करुन त्यावर निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालील प्रमाणे देत आहे.

क्रमांक	मुद्दे	निष्कर्ष
१	वादी असे सिध्द करतो का की वाद मिळकत क्र.१(अ) वरील त्याचा ताबा कायदेशीर आहे ?	होय.
२	वादी असे सिध्द करतो का की दिनांक ०४.०६.२००९ रोजी वाद मिळकतचे करण्यात आलेले खरेदीखत हे बेकायदेशीर व निरर्थक आहे ?	होय.
३	प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार समाविष्ट न केल्याने त्याची बाधा निर्माण होते का ?	नाही.
४	प्रांग न्याय तत्वाची बाधा प्रस्तुत दाव्यास येते का ?	नाही.
५अ	प्रस्तुत दावा चालविण्याचा अधिकार या न्यायालयास आहे का ?	होय.

५	दाव्यात मागणी केलेल्या अनुतोष मिळण्यास वादी पात्र आहे का ?	अंशतः होय.
६	आदेश काय ?	दावा अंशतः मंजुर करण्यात येतो.

कारणेमिमांसा

१२. वादी व प्रतिवादी यांच्या बाजुने त्यांनी केलेल्या दाव्यातील तथ्यकथनाच्या पुष्टयर्थ तोंडी व दस्तऐवज पुरावा अभिलेखावर दाखल केलेला आहे. वादीच्या बाजुने तोंडी पुराव्यात स्वतःस निशाणी ३५ वादी साक्षीदार क्र.१ म्हणून तपासले आहे. तर वाद मिळकतीचे मुळ मालक श्री.धाडीवाल यांना वादी साक्षीदार क्र.२ म्हणून निशाणी ७६ वर, डॉ.केदार भाटे यांना वादी साक्षीदार क्र.३ म्हणून निशाणी ९७, आणि नामदेव गायकवाड यांना वादी साक्षीदार क्र.४ म्हणून निशाणी १०४ वर तपासण्यात आले. दस्तऐवज पुराव्यामध्ये वादीच्या बाजुने नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००५ चे वादपत्र व दिवाणी अपील क्र.३८७/२०१० या प्रकरणात झालेला न्यायानिर्णय अभिलेखावर दाखल केले आहेत. त्या व्यतिरिक्त मुळ मालक श्री.धाडीवाल यांनी दिलेला अर्ज निशाणी ७३, त्या संबंधीची पावती निशाणी ९० व ७१, ज्ञानदेव अभंग व महादू अभंग यांनी ३२-ग प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेला अर्ज निशाणी ३७ वर, दिनांक ०१.१२.१९८८ रोजी देण्यात आलेले ३२-ग चे प्रमाणपत्र निशाणी ३६ वर दाखल करण्यात आले. निशाणी ४१ वर भिकुबाई हिच्या नावे झालेला फेरफार, निशाणी ६१ वर वादींच्या नावे देण्यात आलेले प्रोबेट सर्टीफिकेट, निशाणी ४२ वर फेरफार नक्कल दाखल करण्यात आली आहे.

१३. प्रतिवादीं क्र.१ ते ६ च्या बाजुने तोंडी पुराव्यात प्रतिवादी क्र.१ ला निशाणी १११ वर प्रतिवादी साक्षीदार क्र.१ म्हणून तपासले आहेत. तर प्रतिवादी क्र.७ ने स्वतःस निशाणी ११७ वर तपासले आहे.

१४. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत ही त्यांच्या मालकीची आहे असे जाहिर होवून मिळण्या करिता दिवाणी दावा क्र.३०/२००५ हा शिरुर येथील दिवाणी न्यायालय क.स्तर येथे प्रस्तुत दाव्यातील वादी विरुध्द दाखल केला होता. तो दावा मंजुर करण्यात आला होता. त्या विरुध्द प्रस्तुत दाव्यातील वादी यांनी मा.जिल्हा न्यायालय, पुणे येथे दिवाणी अपील क्र.३८७/२०१० चे दाखल केले होते आणि दिनांक ०६.०१.२०१८ रोजी ते अपील मंजुर करण्यात आले व दिवाणी दावा क्र.३०/२००५ यातील पारित करण्यात आलेला न्यायनिर्णय रद्द करण्यात आला.

मुद्दा क्र.१ करिता -

१५. वादातीत मिळकती पैकी वाद मिळकत क्र.१(अ) या वरील वादीचा ताबा हा कायदेशीर आहे किंवा नाही हा वादातीत मुद्दा आहे. त्या अनुषंगाने वादीने सरतपासात वाद मिळकत क्र.१(अ) हि त्यास कशी प्राप्त झालेली आहे याचा उहापोह केलेला आहे. सरतपासात तो असे सांगतो की, वाद मिळकत ही विष्णू परीट (अभंग) यांना ते संरक्षीत कुळ असल्यामुळे प्राप्त झाली होती. विष्णू अभंग यांची पत्नी भिकुबाई हि विष्णू नंतर त्याची एकमेव वारस होती. भिकुबाई ही त्याची मावशी होती. वाद मिळकत क्र.१(अ) हि भिकुबाईने त्यास मृत्युपत्रा आधारे हस्तांतरीत केली होती. त्या आधारे महसूल अधिकार अभिलेखात वाद मिळकत क्र.१(अ) हि त्याच्या नावाने नोंदविण्यात आली आणि तेव्हा पासून ती त्याच्या ताबे व उपभोगात आहे.

१६. तोंडी पुराव्याच्या पुष्ट्यर्थ वादीच्या बाजुने अभिलेखावर दस्तऐवज पुरावा दाखल करण्यात आला. त्यामध्ये मध्ये गावनमुना ८अ चा उतारा (निशाणी ४५) वर तसेच ७/१२ नक्कल (निशाणी ४७, ४८, ५०, ५१, ५२, ५३, ५५) वर दाखल करण्यात आलेले आहेत. सदर दस्तऐवज पुरावा सन १९९७-९८ पासून वाद मिळकत क्र.१(अ) ची नोंद महसुल अधिकार अभिलेखात वादीच्या नावे असल्याचे दर्शविते व ती नोंद फेर क्र.१६५३ च्या अन्वये झाली असल्याची दिसून येते.

१७. प्रतिवादींचा या संबंधी असा बचाव आहे की, विष्णू महादेव परीट यांची भिकुबाई ही दुसरी पत्नी होती आणि त्यामुळे ती कायदेशीर पत्नी नसल्यामुळे मृत्यूपत्रा आधारे वाद मिळकत क्र.१(अ) ही वादीला हस्तांतरीत करण्याचा अधिकार नव्हता. प्रतिवादींच्या बाजुने घेण्यात आलेला सदर बचाव विचारात घेतला. दिवाणी अपील क्र.३९७/२०१० या प्रकरणात मा.जिल्हा न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की विष्णूच्या मृत्यूनंतर भिकुबाई ही वाद मिळकतची संरक्षीत कुळ होती आणि भिकुबाईने वाद मिळकत क्र.१(अ) हि मृत्यूपत्रा आधारे हस्तांतरीत केलेली असल्याचे दिसून येते. त्या आधारे वाद मिळकत ही फेर क्र.१६५३ अन्वये वाद मिळकत क्र.१(अ) ही वादीच्या नावे महसुल अधिकार अभिलेखात नोंदविण्यात आल्याचे स्पष्ट होते. तसेच अभिलेखावर वादीच्या बाजुने प्रोबेट सर्टीफिकेट (निशाणी ६१) दाखल करण्यात आलेले आहे. महसुल अधिकार अभिलेखातील नोंदी या सन १९९७-९८ पासून असल्याचे दिसून येते. त्या नोंदी प्रतिवादींनी अव्हानीत केल्या असल्याचे दिसून येत नाही. सदर नोंदी या वादीच्या तथ्यकथन प्रमाणे भिकुबाई यांनी दिलेल्या मृत्यूपत्रा आधारे महसुल अधिकार अभिलेखात नमूद केल्या आहेत. मा.जिल्हा न्यायालयाने दिवाणी अपील क्र.३९७/२०१० या मध्ये भिकुबाई ही विष्णुच्या मृत्यूनंतर वाद मिळकतीची संरक्षीत कुळ होती असा निष्कर्ष नोंदविलेला आहे. तसेच पुढे असे निरीक्षण नोंदविले आहे की मृत्यूपत्रा आधारे वाद मिळकत क्र.१(अ) हि भिकुबाईने वादीस हस्तांतरीत केलेली असल्याचे दिसून येते.

१८. दिवाणी अपील क्र.३९७/२०१० हे नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००५ यातील न्यायनिर्णया विरुध्द मा.जिल्हा न्यायालय, पुणे येथे दाखल करण्यात आले होते. नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००५ हे प्रकरण प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी वाद मिळकत वरील मालकी हक्क उदघोषित होण्याकरिता दाखल केला होता आणि त्यातील वाद मिळकत व प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत ही एकच आहे. त्यामुळे दिवाणी अपील क्र.३९७/२०१० यातील

न्यायनिर्णय हा प्रस्तुत दाव्यास बंधनकारक आहे.

१९. भिकुबाई ही विष्णूची पत्नी असणे व मा.जिल्हा न्यायालय पुणे यांनी दिवाणी अपील क्र.३९७/२०१० यामध्ये भिकुबाई हि विष्णूच्या मृत्यूनंतर वाद मिळकतची संरक्षीत कुळ होती असे निरीक्षण नोंदविणे. तसेच मृत्यूपत्रा आधारे वाद मिळकत क्र.१(अ) हि वादीस भिकुबाई हिने हस्तांतरीत केले असल्याचे दिसून येते असे निरीक्षण केलेले आहे. मृत्यूपत्रा आधारे वाद मिळकत क्र.१(अ) ही फेर क्र.१६५३ अन्वये वादीच्या नावे महसुल अभिकार अभिलेखात नोंदविण्यात येणे. तसेच महसुल अधिकार अभिलेखात सन १९९७-९८ पासून सातत्याने वाद मिळकत क्र.१(अ) वादीच्या नावावर नोंदविलेली असणे व ती नोंद प्रतिपक्षाच्या बाजुने आव्हानीत न करणे हे सर्व तथ्य वाद मिळकत वरील वादीचा ताबा हा कायदेशीर असल्याचे दर्शवितो. वाद मिळकत क्र.१(अ) ही महसुल अधिकार अभिलेखात कायदेशीर पध्दतीने वादीच्या नावे नोंदविलेली असल्याचे दिसून येते. सबब मी या निष्कर्षावर येतो की वाद मिळकत वरील वादीचा ताबा हा कायदेशीर आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला होकारार्थी घोषित करतो.

मुद्दा क्र.२ करीता -

२०. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या लाभात दिनांक ०४.०६.२००९ रोजी वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) चे नोंदणीकृत खरेदीखत निष्पादीत करुन दिले. ते तथ्य वादरहित आहे. वादीने सदरचे खरेदीखत रद्द करण्याची विनंती केलेली आहे व त्या संबंधी असे तथ्यकथन केले की प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) ची मालकी प्राप्त नसल्यामुळे त्यांना ती मिळकत विक्री करण्याचा अधिकार नव्हता. तर या उलट प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी असा बचाव केला की, वाद मिळकतचे मुळ संरक्षीत कुळ विष्णू अभंग यांचे सख्खे भाऊ नामे ज्ञानदेव व मारुती हे होते व विष्णू अभंग यांस अपत्य नसल्याने विष्णू व त्याच्या पत्नीची देखभाल ज्ञानदेवचा मुलगा आनंद (प्रतिवादी क्र.१) याने केलेली

आहे. म्हणून विष्णू अभंग नंतर वाद मिळकतचे मुंबई जमीन कुळ अधिनियम कलम ३२-एम चे सर्टीफिकेट आनंदा ज्ञानदेव, ज्ञानदेव अभंग व मारुती अभंग यांच्या नावे देण्यात आले होते. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ६ हे त्यांचे वारस असल्यामुळे वाद मिळकतची मालकी वारस हक्काने त्यांच्याकडे प्राप्त झाली. म्हणून त्यांना वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) विक्री करण्याचा अधिकार आहे. प्रतिवादी क्र.७ ने सुध्दा प्रतिवादी क्र.१ ते ६ च्या उपरोक्त तथ्यकथनास पुष्टी दिली. त्याने पुढे असे तथ्यकथन केले की वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) हि त्याने प्रतिवादी क्र.१ ते ६ कडुन नोंदणीकृत खरेदीखताने दिनांक ०४.०६.२००९ रोजी खरेदी केली.

२१. वादी व प्रतिवादी यांनी उपरोक्त केलेले तथ्यकथन सिध्द करण्या करिता तोंडी पुराव्याचा आधार घेतला. तोंडी पुराव्यात वादीने प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) चा मालकी हक्क व अधिकार नसताना ही दिनांक ०४.०६.२००९ रोजी प्रतिवादी क्र.७ ला सदर वाद मिळकत खरेदीखता द्वारे विक्री केली असल्यामुळे ते खरेदीखत हे अवैध आहे असे सांगितले. तर प्रतिवादी क्र.१ आनंदा याने तोंडी पुराव्यात मुंबई जमीन कुळ अधिनियम ३२-एम चे प्रमाणपत्र दिनांक ०१.१२.१९८८ रोजी तहसिलदार यांनी त्यांस, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे वडील ज्ञानदेव व प्रतिवादी क्र.५ व ६ चे वडील मारुती यांच्या नावे दिलेले असल्यामुळे वाद मिळकतची मालकी त्यांना प्राप्त झालेली होती. त्यानंतर उपविभागीय अधिकारी पुणे यांची पुर्व परवानगी घेवूनच वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) हि प्रतिवादी क्र.७ ला त्यांनी नोंदणीकृत खरेदीखताने विक्री केलेली आहे.

२२. प्रतिवादी क्र.७ ने वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) ही प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखताने रक्कम रु.८,५०,०००/- दिनांक ०४.०६.२००९ रोजी खरेदी केलेली असल्यामुळे तो सदर मिळकतीचा मालक झाला असल्याचे आपल्या तोंडी पुराव्यात सांगितले.

२३. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी मुंबई जमीन कुळ अधिनियम कलम ३२ एम चे प्रमाणपत्र दिनांक ०१.१२.१९८८ रोजी प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे वडील नामे ज्ञानदेव व प्रतिवादी क्र.४ ते ६ यांचे वडील मारुती यांच्या नावे देण्यात आल्यामुळे सदर वाद मिळकतचे मालक ते झाले होते आणि म्हणून त्यांना ती मिळकत हस्तांतरीत करण्याचा अधिकार होता असे तथ्यकथन करण्यात आलेले आहे. परंतु नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००५ हा प्रस्तुत प्रतिवादी यांनी सदर दाव्यातील वादी यांच्या विरुध्द दाखल केला होता आणि प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकतची मालकी त्यांच्या लाभात देण्यात आलेले मुंबई जमीन कुळ अधिनियम कलम ३२ एम चे प्रमाणपत्रा आधारे वाद मिळकत वरील मालकी उदघोषित होवून मिळण्याचा अनुतोष मागितलेला होता आणि त्या प्रकरणातील न्यायानिर्णया विरुध्द दिवाणी अपील क्र.३९७/२०१० मध्ये मा.जिल्हा न्यायालय, पुणे यांनी असे स्पष्ट निष्कर्ष नोंदविला की प्रतिवादी क्र.१ आनंदा व प्रतिवादी क्र.२ व ३ चे वडील ज्ञानदेव व प्रतिवादी क्र.४ ते ६ यांचे वडील मारुती यांच्या लाभात दिनांक ०१.१२.१९८८ रोजी वाद मिळकतचे देण्यात आलेले मुंबई जमीन कुळ अधिनियम कलम ३२ एम चे प्रमाणपत्र हे कायदेशीर तरतुदीची अंमलबजावणी न करता देण्यात आलेले आहे त्यामुळे ते ग्राहय धरता येणार नाही. त्या आधारे सदर प्रतिवादींचा वाद मिळकत वरील मालकीहक्क त्यांनी नाकारलेला आहे. तरी दिवाणी अपील क्र.३९७/२०१० यात मा.जिल्हा न्यायालयाने प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी यांचा वाद मिळकत वरील त्यांचा मालकी हक्क जाहिर करण्याची विनंती नाकारलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचा मालकी हक्क वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) जर सिध्द होत नाही तर सदर मिळकतीचे प्रतिवादी क्र.७ च्या लाभात त्यांनी निष्पादीत करुन दिलेले दिनांक ०४.०६.२००९ चे खरेदीखत हे त्यांना मालकीहक्क नसताना करुन दिलेले आहे हे स्पष्ट होते. म्हणून ते खरेदीखत त्यामुळे वैध नाही. त्यामुळे मी या निष्कर्षावर येतो की दिनांक ०४.०६.२००९ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या लाभात करुन दिलेले खरेदीखत हे बेकायदेशीर आहे. सबब मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवितो.

मुद्दा क्र.३ करीता -

२४. प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार समाविष्ट न केल्यामुळे त्याची बाधा प्रस्तुत दाव्यास येत आहे अशी हरकत प्रतिवादींनी घेतलेली आहे. त्या अनुषंगाने प्रतिवादींनी लेखी उत्तरपत्रामध्ये असे तथ्यकथन केले की भागोजी अभंग यांच्या वारसांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट केलेले नाही.

२५. प्रतिवादी यांनी घेतलेली हरकत मी विचारात घेतली. वादीच्या तथ्यकथना प्रमाणे सर्वे क्र.१२४९ चे पूर्ण क्षेत्रफळ १० हेक्टर ३४ गुंठे इतके होते. विष्णू महादू अभंग व भागोजी राघो अभंग हे दोघेही त्या मिळकतीचे संरक्षीत कुळ होते आणि त्या दोघांनीही ती मिळकत संयुक्त मालकी आधारे मुळ मालक श्री.धाडीवाल यांच्याकडुन खरेदी केलेली आहे. त्या दोघांचाही सदर मिळकती मध्ये प्रत्येकी अर्धा हिस्सा असल्यामुळे विष्णू अभंग याच्या हिश्यास ५ हेक्टर १७ गुंठे म्हणजेच संपूर्ण वाद मिळकत व भागोजी अभंग यांना ५ हेक्टर १७ गुंठे प्राप्त झालेली आहे. प्रस्तुत दाव्यात भागोजी याच्या हिश्यास आलेली ५ हेक्टर १७ गुंठे संबंधी प्रस्तुत दाव्यात वाद नाही आणि त्यामुळे भागोजी किंवा त्याचे वारस यांचा प्रस्तुत वाद मिळकतीशी कोणत्याही प्रकारे हितसंबंध नाही असे वादीच्या तथ्यकथन आहे. सबब भागोजी व त्याचे वारस यांची प्रस्तुत दाव्यात हजेरी दाव्याच्या वाद विषय न्यायनिर्णय होणे करीता आवश्यक नाही. त्यामुळे ते प्रस्तुत दाव्यात आवश्यक किंवा योग्य पक्षकार नाहीत. म्हणून प्रतिवादी यांनी उपस्थितीत केलेली या मुद्दया वरील हरकत योग्य नाही. म्हणून मी या मुद्दयाचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

मुद्दा क्र.४ करीता -

२६. प्रस्तुत दावा व नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००५ यातील पक्षकार, वाद विषय आणि वाद मिळकत हे एकच आहेत असे प्रतिवादींनी नमूद केलेले आहे. दिवाणी दावा क्र.३०/२००५ हा न्यायानिर्णया आधारे अंतिम निकाली झाल्यामुळे

सदर दाव्यास प्रांग न्याय तत्वाची बाधा निर्माण होते अशी हरकत प्रतिवादींच्या बाजुने घेण्यात आलेली आहे. प्रतिवादींच्या बाजुने घेण्यात आलेली हरकत न्यायालयाने विचारात घेतली. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००५ हा शिरुर येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत वरील त्यांची मालकी उदघोषित होवून मिळण्यासाठी दाखल केला होता. सदर दोन्ही दाव्यातील पक्षकार आणि वाद मिळकत हे जरी एकच असले तरी दोन्ही दाव्यातील वाद विषय हे वेगळे होते. प्रस्तुत दाव्यात वाद मिळकत क्र.१(अ) वरील वादीचा ताबा कायदेशीर आहे तसेच प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या लाभात वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) चे निष्पादीत करुन दिलेले खरेदीखत रद्द होवून मिळण्याची विनंती या दाव्यात केलेली आहे. तर नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००५ या मध्ये उपरोक्त दोन्ही अनुतोष मागितलेले नव्हते. त्या दाव्यात प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी यांनी वाद मिळकती वरील त्यांची मालकी उदघोषित होवून मिळण्याचा अनुतोष मागितलेला होता. त्यामुळे दोन्ही दाव्यातील मागितलेले अनुतोष हे भिन्न असल्यामुळे सदर दाव्यास प्रांग न्याय तत्वाची बाधा निर्माण होत नाही. त्यामुळे मी सदर मुद्दा नकारार्थी घोषित करीत आहे.

मुद्दा क्र.५ अ करीता -

२७. प्रतिवादींच्या बाजुने सदर दावा दिवाणी न्यायालयास चालविण्याचा अधिकार नसल्याची हरकत घेतली आहे. त्या अनुषंगाने त्यांचे असे तथ्यकथन आहे की प्रस्तुत दाव्यात वादीने मुंबई जमीन कुळ अधिनियम कलम ३२ एम चे प्रमाणपत्र आव्हनीत केलेले आहे. त्यामुळे मुंबई जमीन कुळ अधिनियम कलम ८५ अन्वये दिवाणी न्यायालयास ते चालविण्याचा अधिकार नाही. त्याच्या पुष्ट्यर्थ प्रतिवादींच्या बाजुने खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

१. शेवंताबाई मारुतरी खलाटकर -वि- रामु रखमाजी खलाटकर व इतर, ऑल इंडीया रिपोर्टर १९९९ सर्वोच्च न्यायालय २६२८.

२. नरेंद्र जगन्नाथ जोशी -वि- महाराष्ट्र शासन, २००३(१) ऑल महाराष्ट्र रिपोर्टर ८०३

३. भिमा अबा राडे (मयत तर्फे वारस) -वि- श्रीमती.ठकुबाई मारुती राडे व इतर, २००७ (६) ऑल महाराष्ट्र रिपोर्टर १८५.

४. श्री.रामा धोंडु दाते -वि- श्री.कृष्णाजी भिकाजी कदम व इतर, २००३(२) ऑल महाराष्ट्र रिपोर्टर १०२९.

५. शेख वजीर अहमद मुल्ला (मयत) तर्फे वारस व इतर -वि- बन्सी काळु संगमनेरे (मयत) तर्फे वारस व इतर, २०१६(७) ऑल महाराष्ट्र रिपोर्टर ६८५

६. श्रीमती.सावित्रा बापु शिंदे व इतर -वि- राऊ रामा शिंदे व इतर, २००६(१) ऑल महाराष्ट्र रिपोर्टर ४३७

२८. प्रतिवादींच्या बाजुने घेण्यात आलेली हरकत विचारात घेतली. तसेच प्रस्तुत प्रकरणात वादीने वाद मिळकत क्र.१(अ) वरील त्याचा ताबा कायदेशीर आहे असा अनुतोष मागितलेला आहे आणि प्रतिवादी क्र.७ च्या लाभात प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी निष्पादीत करुन दिलेले खरेदीखत आव्हानीत केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात मुंबई जमीन कुळ अधिनियम कलम ३२ एम चे प्रमाणपत्र वादीने आव्हानीत केलेले नाही. तसेच मा.जिल्हा न्यायालय पुणे यांनी दिवाणी अपील क्र.३९७/२०१० या प्रकरणात प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्या लाभात वाद मिळकतचे देण्यात आलेले ३२ एम, मुंबई जमीन कुळ अधिनियम चे प्रमाणपत्र हे वैध नसल्यामुळे सदर वाद मिळकत वरील प्रतिवादी क्र.१ ते ६ ची मालकी नाकारलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात वादीने मुंबई जमीन कुळ अधिनियम कलम ३२ एम चे प्रमाणपत्र आव्हानीत केलेले नाही. म्हणून सदर दावा दिवाणी न्यायालयास चालविण्याचा अधिकार नाही ही प्रतिवादीची हरकत मान्य करता येणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.५अ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

मुद्दा क्र.५ करीता -

२९. वादीने वाद मिळकत १ (अ) वर त्याचा ताबा हा कायदेशीर आहे हे सिध्द केल्या मुळे तसेच प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या लाभात दिनांक

०४.०६.२००९ रोजी मालकी अधिकार नसताना खरेदी खत निष्पादीत करुन दिले. हे सिध्द केल्यामुळे प्रस्तुत दावा त्या अनुषंगाने केलेले अनुतोष मंजुर होणेस पात्र आहे. परंतु वादी मिळकत क्र.ब ते ड चा खुला ताबा त्यास मिळण्याची विनंती त्याने वादपत्राच्या विनंती कलमात जरी त्याने केली असली तरीही त्या संबंधी वादपत्रात काही तथ्यकथन केले नाही. म्हणून त्या संबंधी वादपत्राच्या विनंती कलमात केलेली विनंती क्र. "ब" ही मंजुर करण्यास पात्र नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.५ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवितो.

मुद्दा क्र.६ करीता -

३०. मुद्दा क्र.१, २ ला होकारार्थी व ५ ला अंशतः होकारार्थी घोषित केल्याने व मुद्दा क्र.३, ४ व ५अ यांना नकारार्थी घोषित केल्यामुळे प्रस्तुत दावा हा अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१. प्रस्तुत दावा खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. वाद मिळकत क्र.१(अ) वरील वादीचा ताबा हा कायदेशीर असल्याचे उदघोषित करण्यात येते.

३. वाद मिळकत क्र.१ (क) व (ड) चे दिनांक ०४.०६.२००९ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या लाभात निष्पादीत करुन दिलेले खरेदीखत हे वैध नाही असे जाहिर करण्यात येते.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

पुणे
दिनांक ०५.०३.२०१९

(राजेश क. खोमणे)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर पुणे.

CERTIFICATE

I affirms that, the contents of the P. D. F. file order are same word for as per original order.

Name of Steno	:	P. K. Shirolkar (Steno Grade II)
Name of P.O.	:	R. K. Khomne, Addl. Small Causes Judge & Jt. C. J. S. D., Pune.
Date of Order	:	05.03.2019
Date of Signature of P. O.	:	18.03.2019
Date of P.D.F.	:	18.03.2019.